epaper.सामना.com
साठी येथे क्लिक करावे.
epaper.saamana.com

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
संपादक : बाळ ठाकरे
ISO 9001:2000



Finance Updates
Get Updates on Top Gainers,Losers on Guruji Finance.Click Now!
finance.guruji.com

सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# दुरितांचे तिमिर जावो

## कोणताही व्यक्तिगत किंवा सामुदायिक पद्धतीने केलेला साधनेचा संकल्प सेवेशिवाय सिद्ध होत नाही. किंबहुना समाजासाठी केलेली नि:स्वार्थ सेवा हा प्रत्येक साधनेचा मूलभूत पाया आहे.

विश्वाचा प्रवास हा समतेकडे होत आहे असे आधुनिक विज्ञानाचा थर्मोडायनॅमिक्सचा 'एन्ट्रोपी' हा तिसरा सिद्धान्त सांगतो. म्हणूनच विषमतेकडून समतेकडे मार्गक्रमणा करणे हे अध्यात्माचे उच्चतम ध्येय मानले गेले आहे. संपूर्ण समता म्हणजे साक्षात मोक्ष! अंतरात संपूर्ण समतेची अवस्था प्राप्त झाल्याशिवाय मनुष्य जीवत्व-बंधनातून मुक्त होऊन मोक्षावस्थेपर्यंत पोहोचू शकत नाही. अशी समता साध्य केलेल्या सत्पुरुषांना स्वत:प्रमाणेच प्रत्येकात एकाच ईश्वराचे दर्शन होत असते. ही समता अंतरात निर्माण होण्याकरिता नामजप, मंत्रसाधना यासारखे सत्कर्म करण्याबरोबरच विषमता दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे आवश्यक असते. तन, मन आणि धनाच्या माध्यमातून समाजातील, निसर्गातील विषमता दूर करण्यासाठी केलेले नि:स्वार्थ प्रयत्न यालाच सेवा असे म्हणतात.

अध्यात्मात प्रगती करण्यासाठी काही साधना करण्याचा संकल्प प्रत्येक साधक करीत असतो. कोणताही व्यक्तिगत किंवा सामुदायिक पद्धतीने केलेला साधनेचा संकल्प सेवेशिवाय सिद्ध होत नाही. किंबहुना समाजासाठी केलेली नि:स्वार्थ सेवा हा प्रत्येक साधनेचा मूलभूत पाया आहे.

कोणताही सजीव देह हा हजारो पेशींच्या समुदायापासून बनलेला असतो व अशा प्रत्येक पेशीला मन असते, असे विज्ञान सांगते. मानवाने जर आपल्या मनाच्या माध्यमातून या पेशींच्या मनापर्यंत आपले कृतज्ञतेचे व प्रार्थनेचे संदेश पोहोचवले तर या पेशी हळूहळू सहकार्य करू लागतात, असेही विज्ञान सांगते. अशा अनेक संघटित पेशीसमूहांचं जर सहकार्य असेल तर मानवी मनास त्या त्या प्रमाणात सुखप्राप्ती होते. हिंदुस्थानी अध्यात्माने यापुढे आणखी एक पाऊल टाकत विश्वमन व समाजपुरुष ही संकल्पना सांगितली आहे. ज्याप्रमाणे अनेक पेशींचा समुदाय म्हणजे एक देह त्याप्रमाणेच अनेक मनांचा समुदाय म्हणजे विश्वमन अथवा समाजपुरुष ही ती संकल्पना आहे. संत ज्ञानेश्वरांनी संपूर्ण विश्वकल्याणासाठी वैश्विक शक्तीकडे 'पसायदान' मागितले आहे-

दुरितांचे तिमिर जावो
विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांछील तो तें लाहो
प्राणिजात ॥ १८.१७९६॥

'जो जें वांछील तो तें लाहो' म्हणजे ज्याला ज्याची इच्छा असेल त्याला ते मिळोत. पसायदानातील ही प्रार्थना सर्वांच्या लक्षात असेल. कारण ही प्रार्थना आपल्या कानाला गोड आणि मनाला हवीहवीशी वाटते, परंतु ती पूर्ण होण्यासाठीची पूर्वअट जी सर्वसाधारणपणे स्वार्थसाध्यात गुंतलेल्या अशा आपल्याकडून दुर्लक्षित राहते, ती संत ज्ञानेश्वरांनी त्याआधीच्या ओळीत सांगितली आहे, 'दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो!' दुष्ट लोकांची दुष्ट बुद्धी नष्ट होवो, त्यांचा अज्ञानांधकार जावो व आपले मन, आपले अस्तित्व हे त्या विश्वाचाच एक भाग आहेत हे त्यांना समजो हे या पसायदानात अभिप्रेत आहे. साहजिकच विश्वमन अथवा समाजपुरुष यांना अनुकूल असे जर आपले मन व कर्म बनविले तर आपल्या सहकार्यामुळे विश्वमनाला होणारा आनंद हा पुन्हा आपल्याच मनापर्यंत परतून येतो. जसे कराल तसे मिळेल. क्रोध केलात क्रोध मिळेल, मत्सर केलात मत्सर मिळेल, क्षमा केलीत क्षमा मिळेल इत्यादी जे विचार अध्यात्मात सांगितले जातात त्याचे मूळ विश्वमनाच्या या सिद्धांतात आहे.

विविध रूपाने भूतलावर अवतीर्ण होणाऱ्या ईश्वराची सेवा अनेक मार्गाने करता येते. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक महान तपस्वींनी, संतांनी विविध मार्गांनी या समाजपुरुषाची सेवा करण्याचा आदर्श घालून दिला आहे. अतिप्राचीन काळी निर्माण झालेले अत्युच्च दर्जाचे वैदिक वाङ्मय निर्माण करणाऱ्या ऋषीमुनींची नावेदेखील त्यांनी आपल्या कृतीत गुंफली नाहीत. आज केवळ अनुमानाने त्यांचे कर्ते सांगता येतात. याचाच अर्थ, कीर्ती पराङ्मुख राहून, केवळ नि:स्वार्थ सेवाभावाने प्रेरित होऊन या वाङ्मयाची निर्मिती झाली. कारण त्यात त्यांना विश्वकल्याण अपेक्षित होते.

सत्कर्माला पूरक म्हणून केलेली सेवा अल्पावधीत सिद्ध होण्याकरिता काही किमान अटी आहेत. सेवेची प्राथमिक अट म्हणजे सेवा करीत असताना दुसऱ्यावर उपकार करण्याच्या भावनेचा संपूर्ण त्याग. समाजातल्या ज्या घटकाची आपण सेवा करीत आहोत तोच आपल्याला सेवेची संधी उपलब्ध करून देऊन उपकृत करीत असतो. अहंकारशून्यता ही सेवेची दुसरी महत्त्वाची अट. सौंदर्य, बुद्धिमत्ता, श्रीमंती किंवा अजून कोणत्याही गुणांचा अहंकार बाळगून केलेल्या सेवेचा काडीमात्र उपयोग होत नाही. खरोखरचा परम अर्थ म्हणजे परमार्थ साध्य करण्यासाठी संकुचित स्वार्थबुद्धीचा आणि अहंकाराचा सर्वस्वी त्याग करणे अनिवार्य आहे. ईश्वराला प्राप्त करण्यासाठी कुळ, गोत्र, वंश या कशाचाही वशिला चालत नाही. त्यामुळे या सगळ्याचा वृथा अभिमान बाळगणे गैर आहे. ईश्वरासमोर फक्त त्याग, तप आणि सेवा यांचाच विचार होतो. उपलब्ध असलेल्या श्रम, वेळ आणि धनाचा किमान २५ टक्के भाग ईश्वरसेवेकरिता म्हणजे पर्यायाने समाजसेवेकरिता राखण्याचा नियम आपल्याकडे सांगितला जातो तो यामुळेच. अर्थात या नियमाचे काटेकोर पालन करणे प्राथमिक अवस्थेत असलेल्या सामान्य प्रापंचिक साधकाला अवघड असते. याकरिता स्वत:मध्ये असलेली कौशल्ये आणि गुण समाजाच्या उपयोगासाठी जास्तीत जास्त कसे वापरता येतील याचे आत्मशोधन करून त्यानुसार समाजसेवेचे व्रत प्रत्येक साधकाने स्वत:च्या आध्यात्मिक प्रगतीकरिता अंगिकारणे आवश्यक आहे.

(वासुदेव वामन बापट गुरुजी ओम सद्गुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर आणि खोपोली स्थानांवर गुरूपदी विराजमान आहेत.)

- वासुदेव बापट